ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.


टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, २१ ऑगस्ट, १९६३ | अंक १६

"वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे"



SECO

महाराष्ट्रांत चार कोटी झाडे लावण्याची

वृक्षारोपण मोहीम

२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयन्तीपर्यंत ह्या वृक्षारोपण मोहीमेंत प्रत्येक आबालवृद्धानें उत्साहानें नवीन रोपे—

—शेतांत, गावांत, घराच्या आवारांत,
विद्यापीठें, महाविद्यालयें,
विद्यालयें, गृहनिर्माण मंडळाच्या वसाहती
या सर्व ठिकाणीं
योजनाबद्ध पद्धतीनें झाडें लावून
वृक्षारोपणाची मोहीम
यशस्वी करून
महाराष्ट्राची वनश्री समृद्ध करावी.



अधिक धान्य पिकवूं, अधिक धान्य उगवूं अधिक भाजीपाला उगवूं,
अधिक झाडें लावूं, हाच आमचा निर्धार...

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी विभागाचे प्रकाशन—

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५


# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र


प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, २१ ऑगस्ट, १९६३ | अंक १६





## विविध माहिती

**धातुसंशोधन संस्थेचें स्थलांतर**—कलकत्ता येथील संरक्षणविषयक धातुसंशोधन संस्था तेथून हलवून हैदराबाद येथें चालू करण्यांत येणार आहे. संरक्षक हत्यारें बनविण्यासाठीं लागणाऱ्या विविध प्रकारच्या धातूंविषयीं संस्थेंत संशोधन चालू असतें. शस्त्रास्त्रें, विमानें, प्रक्षेपणास्त्रें, इत्यादि सामग्री तयार करण्यास लागणारे धातु तयार करण्याच्या कामीं संस्था चांगली कामगिरी बजावीत आहे. ह्या संस्थेचा व्याप आतां आणखी वाढविण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानमधील हिंदी व्यापारी**—पाकिस्तानच्या ज्यूट बोर्डाच्या अध्यक्षांनीं अशी माहिती सांगितली कीं, पूर्व पाकिस्तानांत तागाचा व्यापार करणाऱ्या सुमारें ३०० हिंदी व्यापाऱ्यांचे परवाने ह्या वर्षी नव्यानें देण्यांत आले नाहींत. त्यामुळें तागाच्या अंतर्गत व्यापारांतून हिंदी व्यापाऱ्यांची जवळ जवळ हकालपट्टीच झाली आहे. तरीसुद्धां पाकिस्तानच्या तागाच्या निर्यात व्यापारापैकी ४० टक्के व्यापार हिंदी लोकांच्या मार्फत होत असतो.

**पंजाबमधील प्राथमिक शिक्षण**—पंजाबमधील सर्वच्या सर्व म्हणजे १४ हजार सरकारी प्राथमिक शाळांतून पुढील वर्षाच्या मध्यापासून स्त्रीशिक्षकांची नेमणूक करण्यांत येणार आहे. सध्यां सरकारी प्राथमिक शाळांतून १४ हजार शिक्षिका काम करीत आहेत. परंतु एवढ्या शिक्षिका पुरण्यासारख्या नसल्यानें आणखी ४ हजार शिक्षिकांची नेमणूक करण्यांत येणार आहे. सर्व प्राथमिक शाळांतून ह्यापुढें मुलगे व मुली ह्यांना एकत्रच शिकविण्यांत येणार आहे.

**दुधांतील विखार वाढला**—अमेरिकेच्या सार्वजनिक आरोग्यखात्याच्या अधिकाऱ्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, १९६३ च्या मे महिन्यांत करण्यांत आलेल्या चांचणीवरून १९६२ च्या मे महिन्यापेक्षा दुधांतील 'स्ट्रॉन्टिअम' हा विखार दुप्पट झालेला आहे. गेल्या वर्षी रशियानें अंतरिक्षांत अणुबॉम्बचे जे स्फोट केले त्यामुळें दूषित झालेल्या वातावरणाचा हा परिणाम आहे, असा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे.

**फळांच्या पदार्थांचा कारखाना**—आसामचें सरकार एका खाजगी मालकीच्या कंपनीच्या साह्यानें फळापासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचा कारखाना काढणार आहे. हिंदुस्थानांत अशा प्रकारचा हा तिसरा कारखाना होईल. आसामधील अननस आणि नारिंगें परदेशांत बरींच लोकप्रिय झालेलीं आहेत. ह्या फळांपासून बनविण्यांत आलेले टिकाऊ पदार्थहि असेच आवडतील असा अंदाज आहे. शिवाय कारखान्यामुळें फळें पिकवणाऱ्या बागायतदारांचीहि भरभराट होईल.

**कुराण ग्रंथाचें बंगाली भाषांतर**—पाकिस्तानच्या इस्लामिक ॲकॅडेमीनें कुराणग्रंथाचें बंगाली भाषांतर प्रसिद्ध करण्याची योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. सर्व ग्रंथाचें भाषांतर पुरें होण्यास ५ वर्षांचा अवधी लागेल असा अंदाज आहे. ग्रंथाच्या प्रकाशनासाठी २ लाख रुपये खर्च येणार आहे. ह्या ग्रंथाशिवाय अरबी-बंगाली शब्दकोश व इतिहासप्रसिद्ध मुसलमानांचा चरित्रकोश तयार करण्याचाहि संस्थेचा मनोदय आहे.

**विदर्भामधील मोटारवाहतूक**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत विदर्भ भागांतील ५२ टक्के मोटारवाहतुकीची व्यवस्था महाराष्ट्र स्टेट रोड ट्रॅन्सपोर्टकडे घेण्यांत येईल अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं सांगितली. सध्यां विदर्भांतील रस्त्यांवरील वहातुकीपैकीं २९ टक्के रस्त्यावरील वाहतूकच राज्यवाहतूक मंडळ करीत आहे.


दि बेळगांव बँक लिमिटेडला
आपली
**२९ वी शाखा**
जुना राजवाडा, मुधोळ, जिल्हा विजापूर, म्हैसूर राज्य, येथें
३१ जुलै, १९६३ रोजीं
आणि
**३० वी शाखा**
स्टेशन रोड, हुबळी, जिल्हा धारवाड, म्हैसूर राज्य, येथें
१५ ऑगस्ट, १९६३ रोजीं
उद्घाटन केल्याचें जाहीर करण्यास आनंद वाटत आहे.

**दि बेळगांव बँक लिमिटेड**
शेड्यूल्ड बँक] [स्थापना : १९३०
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.
ठेवी : दोन कोटी, पंधरा लक्ष रुपयांवर



अल्पावधींत आम जनतेच्या विश्वासास पात्र झालेली आणि दिवसेंदिवस प्रगतिपथावर असलेली

**जनता सहकारी बँक लिमिटेड, सांगली.**

(कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली)
फोन नं. २४४ रजि. नं. २४०९८
—३०-६-६३ अखेर—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | १,९७,९५० |
| एकूण ठेवी | रु. | १२,७०,७५० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २८,१३,१०० |
| एकूण उलाढाल(Turn over) | रु. | ६,३१,२९,६४[illegible] |

(१-७-६२ ते ३०-६-१९६३)

संपूर्ण सेवा — खास वैशिष्ट्यें — संपूर्ण सुरक्षितता
ज) आकर्षक व्याजाचे दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
न) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. अवश्य भेट द्यावी.
ता) गतवर्षी बँकेनें ८ टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर — एम्. एस्. कराळे, चेअरमन
वसंतरावजी पाटील, व्हा. चेअरमन

# अर्थ

बुधवार, २१ ऑगस्ट, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक निर्णय राजकीय हेतूनें नकोत

### जागतिक बँकेचा सरकारला स्पष्ट इशारा

"महत्त्वाचीं औद्योगिक लक्ष्यें साधण्यासाठी भारतांत बिनसरकारी उद्योगधंद्यांवर अवलंबन भरपूर आहे, पण त्यांत पैशाची गुंतवणूक आकृष्ट व्हावी अशीं विलोभनें मात्र नाहींत. उत्पादनखर्च वाढत असतांहि सरकारनें मूलभूत उद्योगधंद्यांच्या उत्पादनाच्या किंमती नियंत्रित केल्या आहेत. त्यामुळें नफ्याची कूस कमी कमी होत चालली असून उत्पादनवाढीला अडथळा येत आहे. उत्तम दर्जाचा कोळसा ज्या विभागांत सांपडतो, त्यांतील खाणीमालकांना जागतिक बँकेनें तिसऱ्या योजनेंतील विस्तारासाठी देऊं केलेल्या परराष्ट्रीय चलनांतील कर्जाच्या २०% रक्कम वापरतां आलेली नाहीं. खतांच्या कारखान्यांची प्रगति रोडावली आहे; कारण परदेशी कारखानदार भागीदारी स्वीकारण्यास तयार होतील इतपत नफ्याला वावच नाहीं. कागदाच्या ५० कारखान्यांचे लायसेन्स रद्द करावे लागले आणि आणखी २० रद्द होण्याच्या मार्गावर आहेत. कमी महत्त्वाच्या उपक्रमांकडे भांडवल वळूं लागेल अशा प्रकारचीं नियंत्रणें असूं नयेत, " असें जागतिक बँकेच्या ताज्या रिपोर्टनें भारत सरकारला बजावलें आहे. ज्या उद्योगधंद्यांत बँकेचा हितसंबंध आहे–तिनें कर्जे दिलीं आहेत–त्यांच्या उत्पादनाच्या सरकारमान्य किंमतींत तिनें खूपच वाढ सुचविली आहे. (पोलाद : ३० %; उत्कृष्ट दर्जाचा कोळसा: २०%) उत्पादनाच्या खर्चाचा हिशेब करतांना यंत्रसामग्रीच्या मूळ किंमतीचा विचार न करता, यंत्रसामग्री बदलायला येणाऱ्या खर्चाचा विचार केला पाहिजे, हें जागतिक बँकेच्या रिपोर्टाचें सूत्र आहे.

(१) प्रादेशिक विकासावर भर आणि (२) आर्थिक सत्ता एकवटण्याविरुद्ध अयोग्य उपायांचा अवलंब, ह्याविषयीं बँकेच्या अहवालानें नापसंति व्यक्त केली आहे. औद्योगिक क्षमतेची कित्येक लहानसहान कारखान्यांत वाटणी, हा ह्या दोन्हींमुळें अनिष्ट परिणाम होतो. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळें शक्य होणाऱ्या काटकसरींकडे दुर्लक्ष केलें जात आहे आणि त्यामुळें देशावर जादा उत्पादनखर्चाचा बोजा कायमचा पडणार आहे. उदाहरणार्थ, तिसऱ्या योजनेंतील ६०,००० ट्रक्सच्या उत्पादनाचें लक्ष्य चौघांत वाटून देण्यांत आलें आहे. सर्वांत मोठ्याच्या ("टेल्कोच्या") वाट्याला २४,००० ट्रक्सचें वार्षिक उत्पादन आलें आहे. ह्या चाराहि कारखान्यांनीं थोड्या उत्पादनानें प्रारंभ केला; मागणी वाढली तसे कारखानेहि वाढले; (टेल्कोची उत्पादनक्षमता १९५४ मध्यें फक्त ६,००० ट्रक्सची होती) पण किमान मोठ्या आकाराबद्दलचा तांत्रिक सल्ला मध्यवर्ती सरकारनें मानला नाहीं. तो मानला असता, तर भांडवली खर्चात बचत झाली असती; विशेषतः दुर्मीळ परराष्ट्रीय चलन वांचलें असतें.

प्रादेशिक मागण्या पुऱ्या पाडण्याच्या आवश्यकतेचें मूळ राजकीय आहे; आर्थिक नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ५०,००० स्कूटर्सची वार्षिक निर्मिति अभिप्रेत आहे आणि त्यासाठी फक्त दोन कारखान्यांना लायसेन्स द्यावा, असें नियोजन मंडळानें सुचविलें होतें. पण, प्रत्यक्षांत सात कारखान्यांत ती उत्पादनक्षमता वाटून दिल्यामुळें प्रत्येक कारखाना फार लहान आकाराचा झाला; सहाजिकच स्कूटर्सचा उत्पादनखर्च वाढून गिऱ्हाइकांना त्या महाग पडणार. " मध्यवर्ती सरकारनें आपला योग्य निर्णय अंमलांत आणण्याचें सामर्थ्य तरी दाखवावें, नाहींतर आर्थिक निर्णय राजकीय कक्षेच्या बाहेर तरी ठेवावे " असें जागतिक बँकेच्या रिपोर्टानें सुचविलें आहे. मध्यवर्ती सरकारचा राज्य सरकारांवरील अधिकार कमी प्रभावी होत चालला असून ही प्रवृत्ति झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें, मध्यवर्ती सरकारनें सामर्थ्य दाखविण्याचा प्रश्न व्यवहार्य ठरतच नाहीं. म्हणून तर जागतिक बँकेच्या रिपोर्टानें, " निर्णय राजकीय कक्षेच्या बाहेर ठेवून तें एखाद्या निःपक्षपाती निम-न्यायालयीन संघटनेकडे सोंपवावें " असें आग्रहानें सांगितलें आहे.

---

## चीन व रशिया ह्यांचें वितुष्ट वाढत चाललें

चीन व रशिया ह्या साम्यवादी राष्ट्रांतील वितुष्ट वाढत चालल्याचीं लक्षणें उत्तरोत्तर स्पष्ट होत चालली आहेत. १९६२ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत चीननें भारतावर आक्रमण केल्यानंतर ह्या संघर्षांत रशिआची भूमिका काय राहील ह्याविषयीं नाना प्रकारचे तर्क करण्यांत येऊ लागले. त्यानंतर जुलै १९६३ मध्यें चीन व रशिआमधील कम्युनिस्ट पक्षांची, वैचारिक मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक बैठक मॉस्कोमध्यें भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींतूनहि कांहीं निष्पन्न न होता उभयता सरकारांतील व पक्षांतील मतभेद अधिकच तीव्र झाले. तथापि चीन-भारत संघर्षासंबंधीं रशियाची भूमिका त्रयस्थाचीच राहिली. आतां मात्र ह्या भूमिकेंत भारताला अनुकूल असा बदल होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या 'प्रावदा' ह्या मुखपत्रांत आतां सडेतोड मतप्रदर्शन करण्यांत आलें आहे. 'अणुयुद्ध आणि जनता' ह्या शीर्षकाखाली लिहिलेल्या एका लेखांत 'प्रावदा' म्हणतो, " भारत व चीन ह्यांच्यामधील सरहद्दीवर मुद्दाम तंग वातावरण निर्माण करण्याचे आणि उभयतामधील वाद लवकर व शांततेच्या वाटाघाटीच्या मार्गानें न सोडविण्याचे चीनचें धोरण दिसत आहे." चीनची अंतर्गत परिस्थिति मोठें दीर्घकालीन युद्ध झेपण्यासारखी समाधानकारक नाहीं. असें असतांनासुद्धां ताठरपणाची वागणूक चीननें चालूच ठेवलेली आहे. कांहीं आंतरराष्ट्रीय निरीक्षकांच्या मतानें चीन अणुबाँबचा पहिला प्रायोगिक स्फोट ह्या किंवा पुढील वर्षीं करण्याची शक्यता आहे. १९५८ पासून चीन अणुशक्तीचा उपयोग लष्करी कारवायासाठी करण्याच्या खटपटींत आहे. ह्या खटपटींत यश आलें तर आंतरराष्ट्रीय राजकारणांत स्वतःच्या बळावरच प्रतिष्ठा व पराक्रम गाजविता येईल अशी चीनची अपेक्षा आहे.

# अर्थ

बुधवार, २१ ऑगस्ट, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक निर्णय राजकीय हेतूनें नकोत

### जागतिक बँकेचा सरकारला स्पष्ट इशारा

"महत्त्वाचीं औद्योगिक लक्ष्यें साधण्यासाठी भारतांत बिनसरकारी उद्योगधंद्यांवर अवलंबन भरपूर आहे, पण त्यांत पैशाची गुंतवणूक आकृष्ट व्हावी अशीं विलोभनें मात्र नाहींत. उत्पादनखर्च वाढत असतांहि सरकारनें मूलभूत उद्योगधंद्यांच्या उत्पादनाच्या किंमती नियंत्रित केल्या आहेत. त्यामुळें नफ्याची कूस कमी कमी होत चालली असून उत्पादनवाढीला अडथळा येत आहे. उत्तम दर्जाचा कोळसा ज्या विभागांत सांपडतो, त्यांतील खाणीमालकांना जागतिक बँकेनें तिसऱ्या योजनेंतील विस्तारासाठी देऊं केलेल्या परराष्ट्रीय चलनांतील कर्जाच्या २०% रक्कम वापरतां आलेली नाहीं. खतांच्या कारखान्यांची प्रगति रोडावली आहे; कारण परदेशी कारखानदार भागीदारी स्वीकारण्यास तयार होतील इतपत नफ्याला वावच नाहीं. कागदाच्या ५० कारखान्यांचे लायसेन्स रद्द करावे लागले आणि आणखी २० रद्द होण्याच्या मार्गावर आहेत. कमी महत्त्वाच्या उपक्रमांकडे भांडवल वळूं लागेल अशा प्रकारचीं नियंत्रणें असूं नयेत," असें जागतिक बँकेच्या ताज्या रिपोर्टानें भारत सरकारला बजावलें आहे. ज्या उद्योगधंद्यांत बँकेचा हितसंबंध आहे–तिनें कर्जे दिलीं आहेत–त्यांच्या उत्पादनाच्या सरकारमान्य किंमतींत तिनें खूपच वाढ सुचविली आहे. (पोलाद : ३० %; उत्कृष्ट दर्जाचा कोळसा: २०%) उत्पादनाच्या खर्चाचा हिशेब करतांना यंत्रसामग्रीच्या मूळ किंमतीचा विचार न करता, यंत्रसामग्री बदलायला येणाऱ्या खर्चाचा विचार केला पाहिजे, हें जागतिक बँकेच्या रिपोर्टाचें सूत्र आहे.

(१) प्रादेशिक विकासावर भर आणि (२) आर्थिक सत्ता एकवटण्याविरुद्ध अयोग्य उपायांचा अवलंब, ह्याविषयीं बँकेच्या अहवालानें नापसंति व्यक्त केली आहे. औद्योगिक क्षमतेची कित्येक लहानसहान कारखान्यांत वाटणी, हा ह्या दोन्हींमुळें अनिष्ट परिणाम होतो. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळें शक्य होणाऱ्या काटकसरींकडे दुर्लक्ष केलें जात आहे आणि त्यामुळें देशावर जादा उत्पादनखर्चाचा बोजा कायमचा पडणार आहे. उदाहरणार्थ, तिसऱ्या योजनेंतील ६०,००० ट्रक्सच्या उत्पादनाचें लक्ष्य चौघांत वाटून देण्यांत आलें आहे. सर्वांत मोठ्याच्या ("टेल्कोच्या") वाट्याला २४,००० ट्रक्सचें वार्षिक उत्पादन आलें आहे. ह्या चाराहि कारखान्यांनीं थोड्या उत्पादनानें प्रारंभ केला; मागणी वाढली तसे कारखानेहि वाढले; (टेल्कोची उत्पादनक्षमता १९५४ मध्यें फक्त ६,००० ट्रक्सची होती) पण किमान मोठ्या आकाराबद्दलचा तांत्रिक सल्ला मध्यवर्ती सरकारनें मानला नाहीं. तो मानला असता, तर भांडवली खर्चात बचत झाली असती; विशेषतः दुर्मीळ परराष्ट्रीय चलन वांचलें असतें.

प्रादेशिक मागण्या पुऱ्या पाडण्याच्या आवश्यकतेचें मूळ राजकीय आहे; आर्थिक नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ५०,००० स्कूटर्सची वार्षिक निर्मिति अभिप्रेत आहे आणि त्यासाठी फक्त दोन कारखान्यांना लायसेन्स द्यावा, असें नियोजन मंडळानें सुचविलें होतें. पण, प्रत्यक्षांत सात कारखान्यांत ती उत्पादनक्षमता वाटून दिल्यामुळें प्रत्येक कारखाना फार लहान आकाराचा झाला; सहाजिकच स्कूटर्सचा उत्पादनखर्च वाढून गिऱ्हाइकांना त्या महाग पडणार. "मध्यवर्ती सरकारनें आपला योग्य निर्णय अंमलांत आणण्याचें सामर्थ्य तरी दाखवावें, नाहींतर आर्थिक निर्णय राजकीय कक्षेच्या बाहेर तरी ठेवावे" असें जागतिक बँकेच्या रिपोर्टानें सुचविलें आहे. मध्यवर्ती सरकारचा राज्य सरकारांवरील अधिकार कमी प्रभावी होत चालला असून ही प्रवृत्ति झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें, मध्यवर्ती सरकारनें सामर्थ्य दाखविण्याचा प्रश्न व्यवहार्य ठरतच नाहीं. म्हणून तर जागतिक बँकेच्या रिपोर्टानें, "निर्णय राजकीय कक्षेच्या बाहेर ठेवून तें एखाद्या निःपक्षपाती निम-न्यायालयीन संघटनेकडे सोंपवावें" असें आग्रहानें सांगितलें आहे.

---

## चीन व रशिया ह्यांचें वितुष्ट वाढत चाललें

चीन व रशिया ह्या साम्यवादी राष्ट्रांतील वितुष्ट वाढत चालल्याचीं लक्षणें उत्तरोत्तर स्पष्ट होत चालली आहेत. १९६२ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत चीननें भारतावर आक्रमण केल्यानंतर ह्या संघर्षांत रशिआची भूमिका काय राहील ह्याविषयीं नाना प्रकारचे तर्क करण्यांत येऊ लागले. त्यानंतर जुलै १९६३ मध्यें चीन व रशिआमधील कम्युनिस्ट पक्षांची, वैचारिक मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक बैठक मॉस्कोमध्यें भरविण्यांत आली होती. ह्या बैठकींतूनहि कांहीं निष्पन्न न होता उभयता सरकारांतील व पक्षांतील मतभेद अधिकच तीव्र झाले. तथापि चीन-भारत संघर्षासंबंधीं रशियाची भूमिका त्रयस्थाचीच राहिली. आतां मात्र ह्या भूमिकेंत भारताला अनुकूल असा बदल होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या 'प्रावदा' ह्या मुखपत्रांत आतां सडेतोड मतप्रदर्शन करण्यांत आलें आहे. 'अणुयुद्ध आणि जनता' ह्या शीर्षकाखालीं लिहिलेल्या एका लेखांत 'प्रावदा' म्हणतो, "भारत व चीन ह्यांच्यामधील सरहद्दीवर मुद्दाम तंग वातावरण निर्माण करण्याचे आणि उभयतामधील वाद लवकर व शांततेच्या वाटाघाटीच्या मार्गानें न सोडविण्याचे चीनचें धोरण दिसत आहे." चीनची अंतर्गत परिस्थिति मोठें दीर्घकालीन युद्ध झेपण्यासारखी समाधानकारक नाहीं. असें असतांनासुद्धां ताठरपणाची वागणूक चीननें चालूच ठेवलेली आहे. कांहीं आंतरराष्ट्रीय निरीक्षकांच्या मतानें चीन अणुबाँबचा पहिला प्रायोगिक स्फोट ह्या किंवा पुढील वर्षी करण्याची शक्यता आहे. १९५८ पासून चीन अणुशक्तीचा उपयोग लष्करी कारवायासाठीं करण्याच्या खटपटींत आहे. ह्या खटपटींत यश आलें तर आंतरराष्ट्रीय राजकारणांत स्वतःच्या बळावरच प्रतिष्ठा व पराक्रम गाजविता येईल अशी चीनची अपेक्षा आहे.

**कोंबडी पाळण्याचा धंदा**—कोंबडी पाळण्याच्या धंद्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी योजण्यांत यावयाच्या उपायांचें संशोधन करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनें एक केंद्र स्थापन केलें आहे. ह्या उद्योगांतील लोकांना जरूर असणारें शिक्षण देण्याची व्यवस्थाहि केंद्रांत करण्यांत येणार आहे. राज्यांतील अंड्यांचें उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. लष्करांतील सैनिकांना भरपूर अंडीं पुरविण्यासाठी त्यांचें उत्पादन वाढविणें अतिशय आवश्यक झालेलें आहे.

**उसाच्या नव्या जाती**—कोइमतूर येथील ऊस-संशोधन केंद्रानें १९६३ सालीं उसाच्या ३४ जातींचा शोध लावला आहे. ह्या जाती निरनिराळ्या प्रकारच्या हवामानांत व जमिनींत लागवड करण्यायोग्य आहेत. ह्या संस्थेचा सुवर्ण-महोत्सव गेल्या डिसेंबरमध्यें साजरा करण्यांत आला. बिहारमधील एका साखर-कारखान्याच्या सहकार्यानें, पाणथळ जमिनींत येऊं शकणाऱ्या उसाची जात शोधून काढण्याचे प्रयत्न संस्था करीत आहे.

**संरक्षण-प्रयत्नांत सहकार्य**—खाजगी मालकीच्या कारखान्यांतील उत्पादनक्षमता संरक्षण-प्रयत्नांत गुंतविण्यासाठी लष्करी गरजांची ओळख खाजगी कारखानदारांना करून देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी मुंबईला एक स्टोअर उघडण्यांत आला आहे. त्यांत ठेवण्यांत आलेल्या मालावरून विशेषतः लष्करी मोटारींना लागणाऱ्या सुट्या भागांची चांगली कल्पना येते. सुमारें १५ हजार प्रकारच्या सुट्या भागांची लष्करी गाड्यांना गरज लागते.

**तेलाच्या उत्पादनाचें तंत्र**—आसाममधील जे विद्यार्थी तेल-उत्पादनाच्या तंत्राचा पदवीनंतरचा अभ्यास करणार असतील त्यांना मदत म्हणून ऑईल इंडिया कंपनीनें २५ हजार रुपयांची रक्कम विद्यापीठ अनुदान मंडळाच्या हवाली केली आहे. ह्याच विषयाच्या पदवीनंतरच्या अभ्यासासाठी कंपनीनें ९ हजार रुपये कलकत्ता विद्यापीठाला दिलेले आहेत.

**चीनची गव्हाची खरेदी**—चीन व कॅनडा ह्यांच्यांत गव्हाच्या पुरवठ्याविषयीं झालेल्या कराराप्रमाणें चीन कॅनडाकडून ११ कोटी, २० लाख ते १८ कोटी, ६७ लाख बुशेल्स गहूं विकत घेणार आहे. गव्हाच्या किंमतीपैकी २५ टक्के रक्कम चीननें ताबडतोब द्यावयाची असून उरलेली १८ महिन्यांत हप्त्यानें चुकती करावयाची आहे. चीनशीं होणाऱ्या व्यापारी देवघेवींत फक्त लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या वस्तूंचा अंतर्भाव करावयाचा नाहीं, असें कॅनडाचें धोरण आहे.

**४४ हजार सरकारी नोकरांना शिक्षा**—१ एप्रिल, १९५७ पासून १९६२ अखेरच्या कालावधींत ४४ हजार सरकारी नोकरांना भ्रष्टाचार, लांचलुचपत, अपहार, इत्यादि गुन्ह्यांबद्दल कमी-अधिक कडक शिक्षा सुनावण्यांत आल्या. ह्या नोकरांपैकी ५५८५ नोकर अधिकारी होते; १५४ गॅझेटेड अधिकारी होते. भारत सरकारच्या गृहखात्यानें मध्यवर्ती सरकारच्या नोकरवर्गांतील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी स्थापन केलेल्या संघटनेनें हे गुन्हेगार पकडलेले होते.

**लष्करासाठी खास तंबू**—भारताच्या उत्तर सरहद्दीचें रक्षण करणाऱ्या जवानांसाठी खास तंबू तयार करण्यांत आले आहेत. हे तंबू अर्धवर्तुळाकृति असून त्यांचा सांगाडा अल्युमिनियमचा आहे. एका तंबूंत १२ जवानांची सोय होऊं शकते. १०० मैल वेगाचें बर्फाचें वादळ झालें तरीहि त्याला दाद न देण्याइतके ते टिकाऊ करण्यांत आले आहेत. तंबूचें छप्पर वाईट हवेला तोंड देण्याइतकें कार्यक्षम करण्यांत आलें आहे.

**दूषित धूलिकणांचा परिणाम**—अणुस्फोटामुळें दूषित झालेली हवा फुप्फुसात घेतल्यामुळें काय परिणाम होतात तें पाहण्यासाठी १० हजार छोट्या प्राण्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. ह्या प्रयोगासाठी न्यू मेक्सिको राज्यांत ३० लाख डॉलर्स खर्चून एक खास आश्रयस्थान बांधण्यांत येणार आहे. माणसाच्या श्वसनें-द्रियांवर विषारी हवेचा काय परिणाम होईल हें पाहण्यासाठी हे प्रयोग करण्यांत येणार आहेत.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.




बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
ठाकूरद्वार, मुंबई ४.
शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

### ग्रामीण भागांतील डॉक्टरांची टंचाई

भारतामधील इतर राज्यांप्रमाणें उत्तरप्रदेशांतहि ग्रामीण भागांत डॉक्टर्सची टंचाई आहे. राज्यांतील कित्येक ग्रामीण दवाखान्यांत काम करण्यासाठी डॉक्टर्स मिळूं शकत नाहींत. ह्या परिस्थितीचा विचार करून तीव्र उपाय सुचविण्यासाठी राज्य सरकारनें एका कमिटीची नियुक्ति केली होती. कमिटीनें परिस्थितीचा अभ्यास करून केलेल्या शिफारशींपैकी कांहीं अशा आहेत. ( १ ) वैद्यकीय अभ्यास करणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचें उत्पन्न दरमहा ३०० रुपयांपेक्षा अधिक नसेल, अशा विद्यार्थ्यांपैकी १० टक्के विद्यार्थ्यांना एम्. बी. बी. एस्. चा अभ्यासक्रम चालू असेपर्यंत बिनव्याजी कर्जें देण्यांत यावींत. हीं कर्जें त्यांनीं सोप्या हप्त्यांनीं फेडावीं. अशा विद्यार्थ्यांनीं अभ्यासक्रम पुरा झाल्यावर ५ वर्षें सरकारी नोकरी करण्याची हमी द्यावी. ( २ ) ज्यांच्या पालकांचें उत्पन्न दरमहा ३०० रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा विद्यार्थ्यांपैकी निदान १० टक्के विद्यार्थ्यांना दरसाल १२०० रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यांत याव्या. ( ३ ) वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांतून प्रवेश दिल्या जाणाऱ्यांच्या संख्येंत २५ टक्के वाढ करण्यांत यावी. ( ४ ) अभ्यासक्रम पुरा केलेल्यांची कायमची नोंदणी करण्यापूर्वी ग्रामीण भागांत काम करण्याची सक्ति करण्यांत यावी. ( ५ ) वैद्यकीय पदवीच्या अभ्यासक्रमाची मुदत कमी करून ती ४॥ वर्षांची करण्यांत यावी. ( ६ ) जे डॉक्टर्स सरकारी नोकरी करीत असतील त्यांना कायम करण्यापूर्वी एक वर्ष ग्रामीण भागांतील नोकरी सक्तीची करावी.; त्याचप्रमाणें पगाराच्या श्रेणींतील कार्यक्षमतेचा अडसर ओलांडण्यापूर्वी २ वर्षें ग्रामीण भागांतील नोकरी सक्तीची करण्यांत यावी. ( ७ ) जे डॉक्टर्स वैद्यकीय शिक्षणसंस्थांतून शिकविण्याचें काम करतात त्यांना खाजगी रीतीनें व्यवसाय करण्याची बंदी करण्यांत यावी.

### जपानकडे निर्यात वाढविण्यास भरपूर वाव

कलकत्ता येथील इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेच्या जागतिक व्यापारखात्यानें भारत व जपान ह्यांच्यामधील व्यापारासंबंधी एक छोटें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, भारतीय मालाची निर्यात जपानकडे करण्यास अद्याप भरपूर वाव आहे. जपानची एकूण वार्षिक आयात सुमारें २,८०० कोटी रुपयांच्या मालाची आहे. परंतु ह्या आयातींत भारताचा वाटा अवघा ५० कोटी रुपये किंमतीचा अथवा एकूण आयातीच्या २ टक्केच आहे. जपान भारताकडून मुख्यत: कच्चा कापूस, अशुद्ध लोखंड, लोखंड व पोलादाची मोड, अभ्रक, मँगेनीझ, मसाल्याचे पदार्थ, लाख, इत्यादि पदार्थ आयात करतो. जपान दरसाल ५ कोटी रुपयांची कॉफी आयात करतो; पण त्यांत भारताचा वाटा दुर्लक्ष करण्याइतका कमी आहे. १९६२–६३ सालांत जपाननें भारताकडून कॉफीची आयात मुळींच केली नाहीं. जपानची कॉफीची बाजारपेठ अद्याप नवीन आहे. त्यामुळें तेथें कॉफीचा खप वाढविण्यासाठी भारताची कॉफी सवलतीच्या किंमतींत विकण्यांत आली पाहिजे असें सुचविण्यांत येत आहे. जपानला कच्च्या साखरेची जरुरी असल्यानें अलीकडील काळापर्यंत भारत जपानला शुद्ध साखर निर्यात करीत नव्हता. परंतु आतां कच्च्या साखरेचें उत्पादन मुद्दाम करण्यांत येत असून तिच्या निर्यातीला खूपच वाव आहे. काजूगर आणि तंबाखू ह्यांच्या निर्यातीलाहि चांगला अवसर मिळण्याची शक्यता आहे. १९६२–६३ सालांत जपानला निर्यात करण्यांत येणाऱ्या कांहीं नेहमींच्या मालांत घट झाली. मँगेनीझचें खनिज, लोखंड व पोलादाची मोड, बिहारचें लोखंड, इत्यादि मालाच्या निर्यातींत घट झाली. परंतु, लोखंडाची मोड, अशुद्ध लोखंड, उसाची मळी, कांहीं रसायनें, इत्यादी मालाच्या निर्यातींत वाढ झाली. भारतामधील चहाची निर्यात जपानला करण्याचे प्रयत्न करण्यांत आले तर ते यशस्वी होण्याची शक्यता आहे.

### शास्त्रीय संशोधनासाठी अधिक पैसा

नवी दिल्ली येथें हिंदमधील शास्त्रज्ञांची व शिक्षणतज्ज्ञांची एक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेचे अध्यक्ष शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री श्री. हुमायन कबीर हे होते. दोन दिवस चाललेल्या ह्या परिषदेच्या अखेरीस सरकारला सल्ला देण्यासाठी २१ जणांची एक समिति नेमण्याचा निर्णय घेण्यांत आला. ह्या समितींत सरकारचे, विद्यापीठांचे व शास्त्रीय संघटनांचे प्रतिनिधि आणि कांहीं प्रमुख शास्त्रज्ञांचा समावेश करण्यांत आला आहे. हिंदजवळ असलेल्या साधनांचा व संशोधकांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यासाठी समितीनें उपाय सुचवावयाचे आहेत. सध्यां १५ हजार संशोधक आपआपल्या क्षेत्रांत शास्त्रीय संशोधन करीत आहेत. येत्या पांच वर्षांच्या कालांत संशोधकांची संख्या सध्यांच्या दुप्पट करण्यांत यावी आणि संशोधनासाठी लागणारा पैसा अधिक प्रमाणांत पुरविण्यांत यावा, अशी मागणी परिषदेतर्फे करण्यांत आली आहे. परिषदेच्या मागण्यांप्रमाणें राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक टक्का रक्कम संशोधन कार्यावर खर्च करण्यांत यावी. सध्या एक टक्क्याच्या एक तृतीयांश एवढीच रक्कम ह्या कामासाठी खर्च करण्यांत येत आहे. शास्त्रीय संशोधनाचें कार्य व्यापक प्रमाणावर करण्यासाठी प्रयोगांचीं उपकरणें व इतर साधनें ह्यांचा तुटवडा पडतो. संशोधनासाठी लागणारें साहित्य बऱ्याच अंशानें परदेशांतून आयात करावें लागतें, म्हणून जरूर त्या साहित्याच्या आयातीसाठी सरकारनें ५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची तरतुद करावी अशी सूचना करण्यांत आली आहे. परिषदेंत बोलतांना श्री. कबीर म्हणाले कीं, जगांतील कोठल्याहि इतर देशांच्या शास्त्रज्ञांपेक्षा भारतामधील शास्त्रज्ञ कमी दर्जाचे नाहींत. असें असलें तरी नोबेल पारितोषक मिळविणाऱ्या इतर देशांतील शास्त्रज्ञांच्या मानानें हिंदी शास्त्रज्ञांची कामगिरी कमी पडते. त्यांची योग्यता आणि कामगिरी ह्यांचा मेळ नीटसा बसत नाहीं.

### शिक्षकांच्या पगाराचा पोस्टामार्फत बटवडा

पंजाबमधील अंबाला, पतिआळा आणि लुधिआना जिल्ह्यांच्या ग्रामीण भागांत काम करणाऱ्या १२ हजार शिक्षकांचे पगार गेले दोन महिने पोस्टामार्फत देण्यांत आले. शिक्षकांचे पगार अधिक सुलभतेनें वाटण्यासाठी पंजाबच्या शिक्षणखात्यानें एक योजना आखली होती. तीप्रमाणें प्रयोग म्हणून हा उपक्रम करण्यांत आला. त्याच्या यशापयशाचे मोजमाप झाल्यावर इतर जिल्ह्यांतूनहि त्याचा अवलंब करण्यात येईल.

### "चीनचा हल्ला होण्याचा संभव कमी !"

चीनचा भारतावर पुन्हा हल्ला होण्याचा संभव कमी आहे असा अंदाज व्यक्त करून अमेरिकेंतील न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो, "गेलीं कित्येक वर्षें कम्युनिझमनें आक्रमक धोरण स्वीकारावें, विशेषत: रशिआनें तें स्वीकारावें असा आग्रह चीन धरीत आहे. परंतु त्याच वेळीं स्वत:वर जोखीम पडेल अशा हालचाली मात्र चीननें केलेल्या नाहींत. आता चीन अण्वस्त्रांचा संपूर्णपणें संन्यास घेण्याच्या धोरणाचा व जागतिक शांततेचा एकमेव खरा पुरस्कर्ता म्हणून स्वत:स म्हणवून घेत आहे. चीननें हिमालयाच्या परिसरांत अलीकडे चालविलेल्या हालचाली आक्रमणासाठी नसून स्वत:ची बळकटी करण्यासाठी असाव्या."

**शास्त्रीय संशोधनांत सहकार्य**—संयुक्त अरब प्रजासत्ताक आणि भारत ह्यांच्या दरम्यान शास्त्रीय संशोधनाबाबत सहकार्य करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्यामुळें उभयतां देशांतील शोधांचा एकमेकांना मोकळेपणानें फायदा घेतां येईल. दोन्ही देशांतील शास्त्रीय संशोधनांत सुसूत्रता आणण्यासाठी भारत व अरब प्रजासत्ताक ह्यांच्यामधील शास्त्रज्ञांची एक संयुक्त समिति स्थापन करण्यांत येणार आहे. एकमेकांच्या शास्त्रज्ञांची व संशोधकांची अदलाबदल करण्यांत येण्याचीहि शक्यता आहे.

**कुराणाचा व्याजाविरुद्ध आदेश**—कुराण ह्या मुसलमानांच्या धर्मग्रंथांत व्याजबट्टा करण्याविरुद्ध आदेश दिलेला आहे. आधुनिक जगांतील इतर देशांप्रमाणें पाकिस्तानांतील स्टेट बँक व इतर सरकारी अगर निमसरकारी द्रव्यसंस्था व्याज आकारीत असतात. असें व्याज आकारणें कुराणाला धरून आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठी इस्लाम धर्मसल्ला मंडळाकडे पाकिस्तानच्या सरकारनें विचारणा केली आहे.

**किरणोत्सर्ग टिपण्यासाठी यंत्राची मागणी**—अणुस्फोटामुळें क्षेपित होणाऱ्या किरणांची नोंद घेणाऱ्या एका आधुनिक उपकरणाची मागणी चीननें एका ब्रिटिश कारखान्याकडे नोंदविली आहे. ह्या उपकरणाची किंमत ७ हजार पौंड आहे. ह्या उपकरणाचा उपयोग शांततामय कामासाठींहि करता येतो. परंतु अणुस्फोट चांचणीबंदीला चीनचा विरोध असल्यानें ह्या मागणीला निराळा रंग चढला आहे. शिवाय, रशिआकडून चीनला जरूर तें उपकरण मिळत नसावें असाहि अंदाज करण्यांत येत आहे.

**भारतीय नृत्यपथकाचा गौरव**—मॉस्कोमधील एका नाट्यगृहांत भारताच्या नृत्यपथकानें आपले दोन कार्यक्रम केले. एक नृत्य रामायणांतील कथाभागावर आधारलेलें होतें. दुसऱ्या कार्यक्रमाचें नांव मुकेले दगड असें होतें. हा दुसरा कार्यक्रम प्रेक्षकांना अतिशय आवडला. इतका कीं, पडदा पडल्यावर रसिक प्रेक्षकांनीं १५ मिनिटें टाळ्यांचा एकसारखा कडकडाट केला. ह्या नृत्यांतील संगीतानें व अभिनयानें प्रेक्षकांना वेडावून टाकलें.

**पक्षाचें खिळा तारेचें घरटें**—टोकिओच्या मध्यभागांत बहुतेक सर्व इमारती उंचच उंच आहेत. सिमेंटकॉंक्रीटच्या ह्या इमारतींपैकी एका इमारतींत पारव्याच्या मादीनें आपलें घरटें बांधलेलें आढळलें. घरटें बांधण्यास मादीला आठवडा लागला. पण हें घरटें नेहमींप्रमाणें गवताकाड्यांचें नव्हतें. आसपास बांधल्या जात असलेल्या इमारतींच्या सामानांतून खिळे, तारा, इत्यादि घेऊन तें बांधण्यांत आलें होतें.

**दारूबंदीचा ब्रिटनमधील प्रयत्न**—ब्रिटनमधील मद्यपानविरोधी संघटनेनें दारूच्या व्यसनाला आळा घालण्यासाठी एक कार्यक्रम आखला आहे. कार्यक्रमांत शिक्षणावर व प्रचारावर भर आहे. संघटनेच्या मतानें दारूच्या अधीन झालेली व्यक्ति रोगी असते. म्हणून तिला मदत करून व्यसनमुक्त केलें पाहिजे. दारूविरुद्ध प्रचार करणारें एक केंद्र लिव्हरपूल येथें स्थापन करण्यांत येणार आहे. केंद्रासाठी दरसाल ३ हजार पौंड खर्च येईल. ब्रिटनमध्यें दारूच्या व्यसनांत गुरफटलेले ४ लाख तरी लोक असावेत.




**शास्त्रीय संशोधनांत सहकार्य**—संयुक्त अरब प्रजासत्ताक आणि भारत ह्यांच्या दरम्यान शास्त्रीय संशोधनाबाबत सहकार्य करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्यामुळें उभयतां देशांतील शोधांचा एकमेकांना मोकळेपणानें फायदा घेतां येईल. दोन्ही देशांतील शास्त्रीय संशोधनांत सुसूत्रता आणण्यासाठी भारत व अरब प्रजासत्ताक ह्यांच्यामधील शास्त्रज्ञांची एक संयुक्त समिति स्थापन करण्यांत येणार आहे. एकमेकांच्या शास्त्रज्ञांची व संशोधकांची अदलाबदल करण्यांत येण्याचीहि शक्यता आहे.


**कुराणाचा व्याजाविरुद्ध आदेश**—कुराण ह्या मुसलमानांच्या धर्मग्रंथांत व्याजबट्टा करण्याविरुद्ध आदेश दिलेला आहे. आधुनिक जगांतील इतर देशांप्रमाणें पाकिस्तानांतील स्टेट बँक व इतर सरकारी अगर निमसरकारी द्रव्यसंस्था व्याज आकारीत असतात. असें व्याज आकारणें कुराणाला धरून आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठी इस्लाम धर्मसल्ला मंडळाकडे पाकिस्तानच्या सरकारनें विचारणा केली आहे.

**किरणोत्सर्ग टिपण्यासाठी यंत्राची मागणी**—अणुस्फोटामुळें क्षेपित होणाऱ्या किरणांची नोंद घेणाऱ्या एका आधुनिक उपकरणाची मागणी चीननें एका ब्रिटिश कारखान्याकडे नोंदविली आहे. ह्या उपकरणाची किंमत ७ हजार पौंड आहे. ह्या उपकरणाचा उपयोग शांततामय कामासाठींहि करता येतो. परंतु अणुस्फोट चांचणीबंदीला चीनचा विरोध असल्यानें ह्या मागणीला निराळा रंग चढला आहे. शिवाय, रशिआकडून चीनला जरूर तें उपकरण मिळत नसावें असाहि अंदाज करण्यांत येत आहे.

**भारतीय नृत्यपथकाचा गौरव**—मॉस्कोमधील एका नाट्यगृहांत भारताच्या नृत्यपथकानें आपले दोन कार्यक्रम केले. एक नृत्य रामायणांतील कथाभागावर आधारलेलें होतें. दुसऱ्या कार्यक्रमाचें नांव मुकेले दगड असें होतें. हा दुसरा कार्यक्रम प्रेक्षकांना अतिशय आवडला. इतका कीं, पडदा पडल्यावर रसिक प्रेक्षकांनीं १५ मिनिटें टाळ्यांचा एकसारखा कडकडाट केला. ह्या नृत्यांतील संगीतानें व अभिनयानें प्रेक्षकांना वेडावून टाकलें.

**पक्षाचें खिळा तारेचें घरटें**—टोकिओच्या मध्यभागांत बहुतेक सर्व इमारती उंचच उंच आहेत. सिमेंटकाँक्रीटच्या ह्या इमारतींपैकी एका इमारतींत पारव्याच्या मादीनें आपलें घरटें बांधलेलें आढळलें. घरटें बांधण्यास मादीला आठवडा लागला. पण हें घरटें नेहमींप्रमाणें गवताकाड्यांचें नव्हतें. आसपास बांधल्या जात असलेल्या इमारतींच्या सामानांतून खिळे, तारा, इत्यादि घेऊन तें बांधण्यांत आलें होतें.

**दारूबंदीचा ब्रिटनमधील प्रयत्न**—ब्रिटनमधील मद्यपानविरोधी संघटनेनें दारूच्या व्यसनाला आळा घालण्यासाठी एक कार्यक्रम आखला आहे. कार्यक्रमांत शिक्षणावर व प्रचारावर भर आहे. संघटनेच्या मतानें दारूच्या अधीन झालेली व्यक्ति रोगी असते. म्हणून तिला मदत करून व्यसनमुक्त केलें पाहिजे. दारूविरुद्ध प्रचार करणारें एक केंद्र लिव्हरपूल येथें स्थापन करण्यांत येणार आहे. केंद्रासाठी दरसाल ३ हजार पौंड खर्च येईल. ब्रिटनमध्यें दारूच्या व्यसनांत गुरफटलेले ४ लाख तरी लोक असावेत.



### आंध्र राज्यांतील साखरेचें उत्पादन

आंध्र राज्यांतील साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी ८ नवीन साखरकारखाने काढण्याचे परवाने देण्याची मागणी राज्यसरकारनें मध्यवर्ती सरकारकडे केली आहे. ह्या नव्या कारखान्यांपैकी बहुतेक कारखाने सहकारी संघटनांचे असतील. तथापि, कांहीं खाजगी भांडवलदारांनींहि परवान्यांसाठी अर्ज केलेले आहेत. आंध्र राज्यांतील साखरेच्या उत्पादनाचें चालू वर्षातील उद्दिष्ट २·५ लाख टन ठरविण्यांत आलें आहे. गेल्या वर्षी राज्यांत १·७३ लाख टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें. भारत सरकारनें साखरेचें उत्पादन ५ लाख टनांनीं वाढविण्याचें ठरविलेलें आहे. संकल्पित वाढ दक्षिण भारतांत नवीन कारखाने काढून अगर जुन्यांचा विस्तार करून करण्यांत यावयाची आहे. उत्तर प्रदेशापेक्षा दक्षिण भारतांत साखरेच्या उत्पादनाला भौगोलिक परिस्थिति अधिक अनुकूल आहे. आंध्रमधील एकाच साखर कारखान्यानें विस्ताराची परवानगी मागितलेली आहे.

---

### रशिआची रोजखपाच्या वस्तूंची खरेदी

मॉस्को येथें हिंदी मालाचें प्रदर्शन भरविण्यांत आल्यापासून भारतामधील रोजखपाच्या मालाला चांगली मागणी येत आहे. भारताच्या स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशननें रशिआला अशा प्रकारच्या अनेक वस्तु पुरविण्याचे करार केले आहेत. रशिआ खरेदी करणार असणाऱ्या मालांत विणलेल्या वस्तु, लोकरीचे कपडे, रुमाल, सिगारेटस्, दाढीची पातीं, पायतणें, इत्यादि माल आहे. शिवाय १ लाख तयार शर्ट घेण्याचा करार करण्यांत आला आहे. शर्टांची किंमत ६ लाख रुपये होईल. रशिआंत भारतामधील पायमोजे बरेच लोकप्रिय झालेले आहेत. वरील मालाशिवाय आंबे आणि अननसाचा रस निर्यात करण्यासंबंधीं रशिअन व्यापारी संघटनेशीं बोलणीं चालू आहेत.

---

### अणुशक्तिजन्य विजेचें दुसरें केंद्र

हिंदमधील अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें दुसरें केंद्र राजस्थानांत कोट्यानजीक उभारण्यांत यावयाचें आहे. ह्या केंद्राच्या स्थापनेसाठी मदत देण्याची तयारी कॅनडानें दाखविली असून भारतानें मदतीचा स्वीकार करण्याचें ठरविलें आहे. केंद्रांत २०० मेगॅवॅट वीज निर्माण करण्यांत येणार असून त्यासाठी ३९ कोटी रुपये खर्च येणार आहे. कॅनडाच्या तंत्रज्ञांनीं तयार केलेल्या आराखड्याप्रमाणें हिंदी शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स उभारणीचें काम करणार आहेत. केंद्रासाठीं लागणारें आण्विक इंधन कॅनडा पुरविणार आहे. असें इंधन पुरविणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय अणुशक्ति मंडळाच्या नियमाप्रमाणें कांहीं बंधनें येतात. हीं बंधनें पाळण्यासंबंधीं कॅनडा व भारत ह्यांच्या दरम्यान अलीकडे वाटाघाटी झाल्या आहेत. राजस्थानांत उभारण्यांत येणाऱ्या वीजकेंद्रांत इंधन म्हणून युरेनिअमचा वापर करण्यांत येणार असून उष्णतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जड पाण्याचा उपयोग करण्यांत येणार आहे.

### संमोहनाच्या प्रयोगासाठीं विमानाचा वापर

संमोहनविद्या अवगत असणाऱ्या एका ब्रिटिश शास्त्रज्ञानें विमानांतून प्रेरणा देऊन आपली विद्या सिद्ध केली. एका सार्वजनिक बागेंत जमलेल्या लोकांभोंवतीं त्यानें एक वर्तुळ काढलें. नंतर तो हेलिकॉप्टरमधून आकाशांत गेला व त्यानें मोहनिद्रा आणणाऱ्या आपल्या शब्दांचा उच्चार केला.त्याचे शब्द जमिनीवरील रेडिओच्या द्वारां वर्तुळांतील लोकांना ऐकविण्यांत आले. त्यांपैकी तीन पुरुष व तीन स्त्रिया मोहनिद्रावश झाल्या; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं आकाशांतून मिळालेल्या आदेशाप्रमाणें कांहीं कसरतीचीं कामेंहि केलीं. दुसरी एक स्त्री एका बाकावर निद्रिस्त झाली. विमानांतून खालीं उतरल्यावर त्याचे शब्द ऐकल्यावरच ती स्त्री पुन्हा जागी झाली.

---

### स्वातंत्र्याच्या १६ व्या वर्षांत महाराष्ट्रानें केलेल्या प्रगतीच्या कांहीं बाबी

आतांपर्यंत महाराष्ट्रांत जमलेला संरक्षण निधि ८॥ कोटी रुपये आणि २·३१ लाख ग्रॅम सोनें एवढा झाला आहे.

आणीबाणीच्या पहिल्या पांच महिन्यांमध्यें संरक्षण बचत, संरक्षण ठेवी आणि इतर बचत योजनांमध्यें १७ कोटी रुपये गुंतविण्यांत आले. १९६२-६३ या वर्षासाठीं असलेल्या २२ कोटी रुपयांच्या इष्टांकापेक्षा ९ कोटी रुपये अधिक जमा झाले.

सैन्यांत प्रत्यक्ष नोकरीवर असलेल्या नॉन कमिशन्ड आणि इतर अधिकाऱ्यांच्या मुलांसाठीं शैक्षणिक सवलती, जमिनी देण्यांत अग्रक्रम, अनुदानाच्या रूपानें मोफत मदत, निवृत्तिवेतन किंवा बिनव्याजी कर्जें, सैन्यभरतींत अग्रक्रम आणि राज्यसरकारच्या अधिकारांतील जागांमध्यें राखीव जागा, अशा बऱ्याच सवलती देण्यांत आल्या.

नियमित गृहरक्षक दलामधील भरतीचें लक्ष्य ५०,००० ठरविण्यांत आलें असून तें यापूर्वीच ओलांडण्यांत आलें आहे. सध्यांची गृहरक्षक संख्या ६६,००० हून अधिक आहे. औद्योगिक गृहरक्षकांची संख्या आतां १,८०० आहे.

राज्यांतील अनेक औद्योगिक वसाहतींपैकीं आठ संपूर्ण विकसित झाल्या आहेत. या संबंधांत सहकारी तत्त्वावर औद्योगिक वसाहती स्थापन करण्यास अग्रक्रम देण्यांत येत असून आतांपर्यंत अशा २६ वसाहती राज्यांत नोंदविल्या गेल्या आहेत.

केन्द्र सरकारनें, या राज्यांत, ५ कारखाने स्थापन करण्याचें ठरविलें आहे-- संरक्षणासाठी शस्त्रास्त्र उत्पादन करणारे चार कारखाने व मिग लढाऊ विमानांच्या उत्पादनासाठी एक कारखाना. हे कारखाने, राज्याच्या ग्रामीण विभागांतील कांहीं ठिकाणीं स्थापन करण्यांत येत आहेत.

गेल्या वर्षी, विकेंद्रीकरण कार्यक्रमाचा भाग म्हणून स्थापन करण्यांत आलेल्या जिल्हापरिषदा व पंचायत समित्या यांचा कारभार, विशेषत: त्यांचे अधिकारी व पदाधिकारी यांच्यामधील संबंधाच्या दृष्टीनें सुरळीत व समाधानकारक असल्याचें आढळून आलें.

१९६१ चा महाराष्ट्र शेत जमीन (कमाल धारण मर्यादा) विषयक कायदा १९६१ च्या मध्यंतरीच्या कालांत अंमलांत आणण्यांत आला. सहकारी संस्थांना मेसर्स फलटण शुगर वर्क्स लि., मेसर्स वालचंदनगर शुगर इंडस्ट्रीज लि., मेसर्स रावळगांव शुगर फार्मस लि. आणि चांगदेव शुगर मिल्स लि., यांच्याकडून यापूर्वीच ३४,३०० एकर जादा जमीन देण्यांत आली आहे.

राज्याची अन्नधान्यविषयक परिस्थिति समाधानकारक आहे. राज्यांतील वाजवी किंमतीच्या दुकानांची संख्या ७,६०० पर्यंत वाढली आहे. राज्यसरकारनें राज्यांत ५०,००० आणि त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या निरनिराळ्या शहरांतून आतांपर्यंत १८ घाऊक भांडारें उघडली आहेत. ह्या घाऊक भांडारांचीं १६८ प्राथमिक भांडारे आणि त्यांना जोडण्यांत आलेल्या १२४ शाखा आहेत.

## अमेरिकेच्या अध्यक्षांसाठी खास गाडी

अमेरिकेच्या फोर्ड मोटार कंपनीनें अमेरिकेच्या अध्यक्षासाठी एक खास मोटारगाडी बनविली आहे. ही गाडी बनविण्यास ४ वर्षें लागलीं. गाडींत अनेक सोयी करण्यांत आलेल्या आहेत. अध्यक्ष बसण्याची जागा १०॥ इंच उंच करता येते व त्या जागेवर झगझगीत प्रकाश टाकता येतो. त्याशिवाय ड्रायव्हर व गाडींतील माणसें ह्यांना रेडिओ-टेलिफोननें बोलतां येतें. गाडींत आग विझविण्याचीं साधनें व प्रथमोपचाराचीं साधनें ठेवलेलीं आहेत. प्रे. केनेडी ह्यांची सध्यांची गाडी ११ वर्षांची जुनी असून तिनें तीन अध्यक्षांना एक लाख मैल हिंडविलेलें आहे. नवी गाडी त्यांना भाड्यानें देण्यांत आलेली आहे.

## प्राचीन आर्यांचीं दहनोत्तर थडगीं

बनारस विद्यापीठाच्या एका संशोधक तुकडीला मिर्झापूर जिल्ह्यांत आर्य लोकांचीं थडगीं सांपडलीं आहेत. हीं थडगीं दहनोत्तर अवशेषांवर ओबडधोबड दगडांच्या साह्यानें बांधलेलीं असत. शतपथ ब्राह्मणांत प्रेतदहनानंतर अस्थि व राख अशा थडग्यांतून पुरण्यांत येत असल्याचा उल्लेख आहे. शतपथांतील माहितीप्रमाणें आर्यांच्या मृताच्या अवशेषांचें जतन चौकोनी थडग्यांत करण्यांत येत असे आणि अनार्यांच्या अवशेषांचें जतन गोल थडग्यांत करण्यांत येत असे. थडग्याचे ४ प्रकार सांपडले असून ते बहुधा ४ वर्णांचे द्योतक असावे असा तर्क करण्यांत येत आहे. मृतांच्या अवशेषांचीं हीं अखेरचीं स्थानें इसवी सनापूर्वी ७५० ते १००० वर्षांपूर्वींचीं असावीं.

## मार्मगोवा बंदराच्या विकासाची योजना

भारत सरकारच्या वाहतूक व दळणवळण खात्यानें मार्मगोवा बंदराचा विकास करण्याची एक योजना नियोजन मंडळाच्या मंजुरासाठी पाठविली आहे. ह्या योजनेसाठी ८४३ कोटी रुपये खर्च येणार आहे. बंदराची उपयुक्तता वाढविण्यासाठी कांहीं यंत्रसामग्री परदेशांतून आयात करून बसवावी लागेल. यंत्रसामग्रीसाठी ४ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल. बंदरांतील गाळ काढण्यासाठी एक ड्रेजर आणण्यासाठी नियोजन-समितीनें पूर्वींच मान्यता दिली आहे. ह्या यंत्रासाठी १ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल. यंत्र हॉलंडकडून मागविण्यांत येईल. दरम्यान भारताच्या संरक्षण खात्यानें मार्मगोवा बंदराचा विकास करून तेथें एक नाविक तळ उभारण्याची योजना तयार केली आहे. दोन्हीं योजनांचा विचार होणार आहे.

## चंद्रावर जाण्याच्या प्रवासाचीं तिकिटें

अमेरिकेच्या राष्ट्रीय अंतरिक्ष संस्थेनें असा होरा वर्तविला आहे कीं, चंद्रावर जाऊन परत पृथ्वीवर येणारीं अंतरिक्ष-जहाजें येत्या १० वर्षांत तयार होतील. दर महिन्याला १६ खेपा करण्यांत आल्या तर ह्या आंतरग्रह प्रवासासाठी दरसाल १० कोटी डॉलर्स खर्च होतील. प्रवासाला जाणाऱ्या प्रत्येक उतारूला तिकिटासाठी ५० हजार डॉलर्स आकार द्यावा लागेल.

रसाचा थेंबही फुकट न घालवणारा
किर्लोस्कर उसाचा चरक



किर्लोस्कर उसाचे चरक वापरल्यानें कोणत्याहि इतर चरकांपेक्षां अधिक काटकसर, कार्यक्षमता व कामाचा जलद उरक असा तिहेरि फायदा होतो. रोलर्स, गिअर्स व बेअरिंग्ज इत्यादीं सर्व भाग भक्कम पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. ५, १० व १५ हॉ. पॉ. आणि २, ४ व ६ बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या आकारांतील चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

STUSA KM 5/62

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

## अमेरिकेच्या अध्यक्षांसाठी खास गाडी

अमेरिकेच्या फोर्ड मोटार कंपनीनें अमेरिकेच्या अध्यक्षासाठी एक खास मोटारगाडी बनविली आहे. ही गाडी बनविण्यास ४ वर्षे लागलीं. गाडींत अनेक सोयी करण्यांत आलेल्या आहेत. अध्यक्ष बसण्याची जागा १०॥ इंच उंच करता येते व त्या जागेवर झगझगीत प्रकाश टाकता येतो. त्याशिवाय ड्रायव्हर व गाडींतील माणसें ह्यांना रेडिओ-टेलिफोननें बोलतां येतें. गाडींत आग विझविण्याचीं साधनें व प्रथमोपचाराचीं साधनें ठेवलेलीं आहेत. प्रे. केनेडी ह्यांची सध्यांची गाडी ११ वर्षांची जुनी असून तिनें तीन अध्यक्षांना एक लाख मैल हिंडविलेलें आहे. नवी गाडी त्यांना भाड्यानें देण्यांत आलेली आहे.

## प्राचीन आर्यांचीं दहनोत्तर थडगीं


बनारस विद्यापीठाच्या एका संशोधक तुकडीला मिर्झापूर जिल्ह्यांत आर्य लोकांचीं थडगीं सांपडलीं आहेत. हीं थडगीं दहनोत्तर अवशेषांवर ओबडधोबड दगडांच्या साह्यानें बांधलेलीं असत. शतपथ ब्राह्मणांत प्रेतदहनानंतर अस्थि व राख अशा थडग्यांतून पुरण्यांत येत असल्याचा उल्लेख आहे. शतपथांतील माहितीप्रमाणें आर्यांच्या मृताच्या अवशेषांचें जतन चौकोनी थडग्यांत करण्यांत येत असे आणि अनार्यांच्या अवशेषांचें जतन गोल थडग्यांत करण्यांत येत असे. थडग्याचे ४ प्रकार सांपडले असून ते बहुधा ४ वर्णांचे द्योतक असावे असा तर्क करण्यांत येत आहे. मृतांच्या अवशेषांचीं हीं अखेरचीं स्थानें इसवी सनापूर्वी ७५० ते १००० वर्षांपूर्वीचीं असावीं.

## मार्मगोवा बंदराच्या विकासाची योजना

भारत सरकारच्या वाहतूक व दळणवळण खात्यानें मार्मगोवा बंदराचा विकास करण्याची एक योजना नियोजन मंडळाच्या मंजुरासाठी पाठविली आहे. ह्या योजनेसाठी ८४३ कोटी रुपये खर्च येणार आहे. बंदराची उपयुक्तता वाढविण्यासाठी कांहीं यंत्रसामग्री परदेशांतून आयात करून बसवावी लागेल. यंत्रसामग्रीसाठी ४ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल. बंदरांतील गाळ काढण्यासाठी एक ड्रेजर आणण्यासाठी नियोजन-समितीनें पूर्वीच मान्यता दिली आहे. ह्या यंत्रासाठी १ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल. यंत्र हॉलंडकडून मागविण्यांत येईल. दरम्यान भारताच्या संरक्षण खात्यानें मार्मगोवा बंदराचा विकास करून तेथें एक नाविक तळ उभारण्याची योजना तयार केली आहे. दोन्ही योजनांचा विचार होणार आहे.

## चंद्रावर जाण्याच्या प्रवासाचीं तिकिटें

अमेरिकेच्या राष्ट्रीय अंतरिक्ष संस्थेनें असा होरा वर्तविला आहे कीं, चंद्रावर जाऊन परत पृथ्वीवर येणारीं अंतरिक्ष–जहाजें येत्या १० वर्षांत तयार होतील. दर महिन्याला १६ खेपा करण्यांत आल्या तर ह्या आंतरग्रह प्रवासासाठी दरसाल १० कोटी डॉलर्स खर्च होतील. प्रवासाला जाणाऱ्या प्रत्येक उतारूला तिकिटासाठी ५० हजार डॉलर्स आकार द्यावा लागेल.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.